महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ◆ १७ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आदिवासींना दिलेले वन पट्टे धनदांडग्याच्या घशात

### ठाणे जिल्ह्यातील कल्याण, अंबरबाथ, मुरबाड, भिवंडी, सह शहापूर तालुक्यातील प्रकार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील भूमिहीन आदिवासी, कातकरी बांधवाना कसण्यासाठी दिलेल्या वन जमिनी बिल्डर, आणि धन दाडग्यांनी ताब्यात घेऊन तेथे बिनधास्त आपले व्यवसाय थाटले आहेत.परिणामी आधी ही भूमिहीन आणि वन पट्टे मिळून ही हजारो आदिवासी, कातकरी कुटुंबे जमीन मिळेल का? जमीन या प्रतीक्षेत आहेत.



कल्याण तालुक्यात खडवली, नडगाव, दानबाव, मामणोली, कोलिंब, म्हसरोंडी, दहागांव, पोई, रायते, मनिवली, नादप, फळेगाव, काकडपाडा, दहिवली, अडीवली, म्हस्कल, रुंदे, बेल पाडा,,चिंचवळी, वासून्द्री, आपटी, येथील आदिवासी, कातकरी बांधवाना प्राप्त वन जमिनी अनेक धनाड्यानी कब्जा करत अनेक वर्ष स्वतःच्या मालकीच्या जमिनी समजून वापर सुरु केला आहे. कल्याण मुरबाड रस्त्या लगत च्या या मोक्याच्या जमिनी बळकावून आदिवासी बांधव फक्त त्या जमिनी आपल्याला मिळाल्या होत्या या समाधानात हलाखीत जीवन जगत आहेत.

वन पट्टे वाटप धोरण भूमिहीनाना आधार ठरावा यासाठी वन जमिनी चे क्षेत्र कमी करत हे वन पट्टे वाटप केले जातात मात्र ते फक्त कागदी घोडे पूर्ण केले जात आहेत अशी भावना या समाज बांधवांची झाली आहे.

खडवली सह नडगाव परिसरात या जमिनी पर प्रांतीयानी बळकांवल्या आहेत. काही जमिनी बिगर आदिवासीनी आपल्या नावावर केल्या आहेत.

हीच स्थिती मुरबाड, सह अंबरनात, भिवंडी, शहापूर तालुक्यात कायम आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी, कातकरी बांधवाना कसण्यासाठी व निवाऱ्यासाठी मिळणाऱ्या या वन जमिनी ताब्यात घेण्यासाठी दलालांची मोठी टोळी कार्यरत आहे. मोक्याच्या जमिनी हेरून ही टोळी आदिवासी कातकरी बांधवाना पैशाचे अमिश दाखवून जमिनी आपल्या ताब्यात घेत आहेत..वन पट्टे वाटप केलेल्या कुटूंबाची माहिती वन विभाग व महसूल विभागाकडे आहे. त्यांनी या बाबत सखोल चौकशी करावी अशी मागणी पर्यावरण मंच केली आहे.

कल्याण तालुक्यात बिल्डर लॉबीनी शेकडो वन जमीन दहागांव रेंज हद्दीतील बळकावली आहे. तीच स्थिती कुंदे व खडवली रेंज मध्ये आहे. मोकळी वन जमीन बिल्डर घशात घालत आहे. त्यास वनविभागाचा मूक पाठिंबा आहे. अशी चर्चा सर्वत्र सुरु आहे.



संघर्ष पत्रकार संघातर्फे आमदार किसन कथोरे, समाजरत्न नानाजी भाई ठक्कर यांच्या उपस्थितीत योगेश हजारें, नरेश महाडसे, सुदाम पाटील यांच्या हस्ते रवींद्र घोडविंदे यांना शिक्षण महर्षी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# राज्यभरात गोपाळकाला उत्साहात साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : राज्यभरात दहीहंडीचा उत्साह पाहायला मिळत आहे. मुंबईसह राज्यातील गोविंदा पथके मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्यासाठी सज्ज झाली आहेत. 'ढाक्कुमाक्कुम ढाक्कुमाक्कुम', 'गोविंदा रे... गोपाळा', 'बोल बजरंग बली की जय' अशा घोषणा देत मानवी मनोऱ्यांचा रोमहर्षक थरार आज अनुभवायला मिळणार आहे. उंचच उंच मानवी मनोरे रचण्यासाठी गोविंदा पथकं सज्ज झाली आहेत.

राज्यभरात विविध दहीहंडीचे आयोजन करण्यात आलं आहे. राज्यभरातील गोविंदांमध्ये जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत असून याच पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात, मुंबईसह उपनगरांमध्ये तसेच पुण्यात दहीहंडीसाठी पोलीस प्रशासन सज्ज झालेलं पाहायला मिळत आहे.राजकीय पक्षांनी दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले असून लाखो रुपयांची बक्षिसे आहेत. अनेक ठिकाणी उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते. अगदी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये आनंद असतो. मुंबईतील दादरमध्ये दहीहंडीचा उत्साह मोठ्या प्रमाणात असतो. दादरमधील 'आयडियल'ची दहीहंडी प्रसिद्ध आहे आणि ती मानाची समजली जाते. येथे महिला गोविंदा पथकेही दहीहंडी फोडण्यासाठी सज्ज असतात.

### जखमी झालेले गोविंदा

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे दाखल गोविंदा -(एकूण - ०५)

१) कु. आदित्य रघुनाथ वर्मा (पु / १८ वर्षे / राहणार - रूम नं. ११३, शिव साई चाळ, वाघोबा नगर, कळवा, ठाणे (पू.) यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे.

२) कु. कृष्णा मिठू स्वयन (पु / १३ वर्षे/ राहणार - रूम नं. ६३३/३६२, मिठू शेठ चाळ, मुंबई पुणे रोड, पारसिक नगर, मुंब्रा, ठाणे) यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली आहे.

३) कु. समर बन्सीलाल राजभर (पु / १० वर्षे / राहणार - लक्ष्मीवाडी, अतकोनेश्वर नगर, कळवा, ठाणे (पू.) यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे.

४) कु. निशांत संतोष सावंत (पु / ०५ वर्षे/ राहणार - रूम नं. ०२, दीपा निवास, कृपेश्वर कॉलनी, भांडुप, मुंबई (प.) यांच्या डाव्या खांद्याला दुखापत झाली आहे. ५) श्री. सौरभ प्रकाश जाधव (पु / २६ वर्षे / राहणार - रूम नं. ०४, मातोश्री चाळ, समर्थ नगर, भांडुप, मुंबई (प.) यांच्या उजव्या खांद्याला दुखापत झाली आहे. जिल्हा शासकीय रुग्णालय, ठाणे येथे दाखल गोविंदा-(एकूण - ०४) १) कु. शिवराज पवार (पु / १० वर्षे / राहणार - साठे नगर, वागळे इस्टेट) यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली आहे.

२) श्री. रोहन पागे (पु / २४ वर्षे / राहणार - कोपरी, ठाणे (पू.) / आई चिखलादेवी गोविंदा पथक) यांच्या नाकाला दुखापत झाली आहे.

३) श्री. कल्पक पाटील (पु / ३५ वर्षे / राहणार - कोपरी, ठाणे (पू.) / आई चिखलादेवी गोविंदा पथक) यांच्या पाठीला दुखापत झाली आहे.

४) कु. करण पवार (पु / १७ वर्षे / बंजारा वस्ती, सेवालाल नगर, वागळे इस्टेट / स्थानिक नागरिक) यांना किरकोळ खरचटलं आहे.

# गडकरी रंगायतनाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहराचा सांस्कृतिक मानबिंदू असलेल्या राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नूतनीकृत वास्तूचा भव्य लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते आणि ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्यदिनी करण्यात आला.





या अविस्मरणीय सोहळ्यास, खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार ॲड. निरंजन डावखरे, माजी खासदार विनय सहस्रबुद्धे, माजी महापौर मिनाक्षी शिंदे, महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त अशोक हांडे, प्रमुख कार्यवाह अजित भुरे, ज्येष्ठ अभिनेते अशोक समेळ, लोककलांचे अभ्यासक प्रकाश खांडगे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर, प्रेक्षागृहात, रंगकर्मी, ज्येष्ठ माजी नगरसेवक, नामवंत ठाणेकर नागरिक, ज्येष्ठ संपादक, पत्रकार आदी आवर्जून उपस्थित होते.

गेले काही महिने नूतनीकरणासाठी गडकरी पडदा बंद, रंगमंच सुना होता. नाट्य रसिकांना वाट पहावी लागली. तो दिवस आज उजाडला आहे. तिसरी घंटा झालेली आहे. नूतनीकृत गडकरी रंगायतनचे लोकार्पण झाले आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. कलाकारांच्या सूचना लक्षात घेऊन या नूतनीकरणाचे काम झाले आहे. ही वास्तू मोडकळीला आली होती. तिचे पूर्ण रुप या नूतनीकरणाने पालटले आहे. नव्याने लिफ्ट आली आहे. त्यामुळे आता ही वास्तू आणखी सुंदर आणि दिमाखदार झाल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

बदलत्या ठाण्यात अनेक गोष्टी येत आहेत. रस्ते, मेट्रो, स्वच्छता यांच्यासोबत आता एक हापूस पार्कही केले जाणार आहे. सेंद्रीय शेतीचा प्रकल्प यापूर्वीच महापालिकेने केला आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

ठाण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी प्रास्ताविकपर भाषणात गडकरी रंगायतनच्या कामाचा आढावा घेतला. तसेच, अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त अशोक हांडे यांनी कलाकारांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन नूतनीकरण करण्यात आल्याबद्दल महापालिकेचे कौतुक केले.

### सुहास जोशी यांचा सन्मान

वयाची ७८ वर्षे आणि रंगभूमीवरील योगदानाची ५२ वर्षे पूर्ण करीत असलेल्या ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांचा याप्रसंगी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सन्मान केला.

### नूतनीकरणातील योगदानाबद्दल सत्कार

रंगायतनच्या नूतनीकरणात योगदान देणाऱ्यांमधील महापालिकेचा सार्वजनिक बांधकाम विभागाचे नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, उपनगर अभियंता शुभांगी केसवानी, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे, गडकरी रंगायतनच्या नावाचे अक्षरसुलेखन करणारे तसेच या संपूर्ण नूतनीकरण कामाचे नियमित परीक्षण कऱणारे उपायुक्त (जनसंपर्क) उमेश बिरारी, कंत्राटदार रवींद्र चव्हाण आणि सल्लागार हितेन सेठी यांच्या वतीने तेजस्विनी पंडित यांचा याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

### ...आणि तिसरी घंटा झाली!

लोकार्पण सोहळ्यासाठी गडकरी रंगायतन आणि त्यासमोरील पूर्ण रस्ता दोन्ही बाजूंनी सजवण्यात आला होता. मुख्य मंचीय कार्यक्रमापूर्वी, गडकरी रंगायतनच्या दर्शनी भिंतीवरील नामफलक आणि कोनशिला यांचे अनावरण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. त्यानंतर, त्यांनी रंगायतनच्या वास्तूमध्ये प्रवेश करून नव्याने करण्यात आलेल्या बदलांची, व्यवस्थेची पाहणी केली. त्यानंतर ते प्रेक्षागृहात स्थानापन्न झाले. राष्ट्रगीत व राज्यगीत झाल्यावर तिसरी घंटा देण्यात आली. गेले दहा महिने बंद असलेला रंगायतनचा पडदा नांदीच्या सुरावटींवर पुन्हा उघडला आणि रसिकांनी टाळ्यांचा गजर केला.

### नांदी, फ्लूजन आणि फोकलोक

ज्येष्ठ शास्त्रीय गायक मुकुंद मराठे यांच्यासह संपदा माने, तन्वी गोरे, शरण्या शेणॉय, धवल भागवत, श्रीकर कुलकर्णी, प्रतीक फणसे या युवा कलाकारांनी नांदी सादर केली. त्यांना केदार भागवत (ऑर्गन), आदित्य पानवलकर (तबला) आणि सुधांशू सोमण (हार्मोनियम) या कलाकारांनी वादन साथ केली. विशेष म्हणजे, रंगायतनच्या उद्घाटन प्रसंगी संगीतभूषण पं. राम मराठे यांनी नांदी सादर केली होती. त्यावेळी युवा कलाकार म्हणून मुकुंद मराठे सोबत होते. आजच्या नांदीसाठी त्यांनी मार्गदर्शनही केला आणि त्यात सहभागही घेतला.

नांदीपाठोपाठ, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या ठाण्यातील मान्यवर कलाकारांनी 'फ्लूजन' हा कलाविष्कार सादर केला. त्यात, पं. विवेक सोनार (बासरी), पं. मुकुंदराज देव (तबला), मोहन पेंडसे (व्हायोलीन), किरण वेहेले (कीबोर्ड), अभिषेक प्रभू (बेस गिटार) आणि सचिन नाखवा (ड्रम्स) हे कलाकार सहभागी झाले. याप्रसंगी रंगायतनच्या वाटचालीची माहिती देणारी ध्वनीचित्रफितही दाखवण्यात आली.लोकार्पण सोहळ्यानंतर 'फोकलोक' या युवा कलाकारांच्या लोकसंगीतावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य होता. त्यास रसिकांनी भरघोस प्रतिसाद दिला.

### 'हर घर तिरंगा' मोहिमेच्या निमित्ताने

# जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी घरी जाऊन वीरपत्नीचा केला गौरव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : 'हर घर तिरंगा' मोहिमेच्या निमित्ताने ठाणे जिल्हा प्रशासनाने एक अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी उपक्रम राबवित स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवान, माजी सैनिक आणि आणीबाणीविरोधी सत्याग्रहींच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेमुळे देशभक्ती आणि त्याग करणाऱ्या व्यक्तींप्रति आदराची भावना अधिक दृढ झाली.

या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्वतः शहीद हवालदार सुधीर धोंडू आंब्रे यांच्या वीरपत्नी श्रीमती सुप्रिया सुधीर आंब्रे यांच्या घरी जाऊन त्यांचे आभार पत्र देऊन सन्मान केला. १७ सप्टेंबर २००१ रोजी जम्मू काश्मीरमधील राजौरी येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात वीरमरण आलेल्या सुधीर आंब्रे यांच्या सर्वोच्च त्यागाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

याचबरोबर, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील तहसिलदारांनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी शहीद सैनिकांच्या वीरमाता, वीरपिता आणि वीरपत्नींच्या घरी जाऊन आभार पत्र दिले. त्यांच्या त्यागाची आठवण ठेवून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

माजी सैनिकांप्रति आदर व्यक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या स्वाक्षरीचे आभार व प्रशंसा प्रमाणपत्र १०,००० हून अधिक माजी सैनिकांना व्हॉट्सॲपद्वारे पाठवण्यात आले. त्यांच्या निःस्वार्थ सेवेबद्दल हा विशेष सन्मान करण्यात आला.

१९७५ च्या आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी लढा दिलेल्या १२९ सत्याग्रहींना देखील जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे आभार व प्रशंसा प्रमाणपत्र तहसिलदारांमार्फत देण्यात आले. त्यांच्या योगदानाला सलाम करत जिल्हा प्रशासनाने त्यांच्याप्रति विशेष आदर व्यक्त केला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, तहसिलदार सचिन चौधर, जिल्ह्यातील सर्व प्रांत अधिकारी, तहसिलदार, इतर महसूल अधिकारी, कर्मचारी आणि ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाने मोलाचा समन्वय साधला.'हर घर तिरंगा' मोहिमेचा भाग म्हणून २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबविलेला हा अभिनव उपक्रम, देशासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करण्याची सामाजिक जाणीव निर्माण करणारा ठरला आहे.






# गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः । ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥ १८-५५ ॥

त्या पराभक्तीच्या योगाने तो मज परमात्म्याला मी जो आणि जसा आहे, अगदी बरोबर तसाच तत्त्वतः जाणतो, तसेच त्या भक्तीने मला तत्त्वतः जाणून त्याचवेळी माझ्यात प्रविष्ट होतो. ॥ १८-५५ ॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः । मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ १८-५६ ॥

माझ्या आश्रयाने राहणारा कर्मयोगी सर्व कर्मे नेहमी करीत असला तरी माझ्या कृपेने सनातन अविनाशी परमपदाला प्राप्त होतो. ॥ १८-५६ ॥

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः । बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ १८-५७ ॥

सर्व कर्मे मनाने माझ्या ठिकाणी अर्पण करून तसेच समबुद्धीरूप योगाचा अवलंब करून मत्परायण आणि निरंतर माझ्या ठिकाणी चित्त असलेला हो. ॥ १८-५७ ॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि । अथ चेत्त्वमहङ्काराान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥ १८-५८ ॥

वर सांगितल्याप्रमाणे माझ्या ठिकाणी चित्त ठेवल्याने तू माझ्या कृपेने सर्व संकटातून सहजच पार होशील आणि जर अहंकारामुळे माझे सांगणे न ऐकशील, तर नष्ट होशील अर्थात परमार्थाला मुकशील. ॥ १८-५८ ॥

## रेसिपी

# नारळाची गोड पोळी



**साहित्य**

गव्हाचं पीठ - 1 ते 2 कप
ओलं खोबरं - 1/2 कप
पांढरे तीळ - 2 चमचे
साखर - 1/2 चमचे
दूध - 1 कप
वेलचीपूड - 1/2 चमचा
साजूक तूप - 1 चमचा
ड्रायफ्रुट्स -
मीठ

**कृती**

पोळी तयार करताना एका खोलगट भांडं घ्या. त्यात कणीक, मीठ,साखर, तूप आणि कोमट दूध घालून कणिक मळून घ्यावीत.कणिक 15 मिनिटे झाकून मुरू द्यावी.यानंतर मिक्सरमध्ये ड्रायफूट्सची भरड काढून घ्यावी.सारणासाठी खोबरं खोवून घ्यावे आणि तीळाची पूड तयार करावी.
पोळी लाटून त्यात ड्रायफूट्स भरड, खोबरं, तीळाची पूड यांचे सारण भरावे.आता पोळीचे तोंड बंद करावे.पुन्हा हलक्या हाताने पोळी लाटून घ्यावी.तवा गरम झाल्यावर पोळी तव्यावर टाकून तूप सोडावे.तूप टाकून पोळी दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्यावी.

### जि.प.उच्च प्राथमिक केंद्र शाळा कोने येथे
# संगणक लॅबचे उद्घाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : देशाच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा परिषद केंद्र शाळा कोने येथे भविष्यकालीन संगणक शाळेचे उद्घाटन करण्यात आले. सदर संगणक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्यापनातील विविध व्हिडिओ पाहून त्यावरील संकल्पना ऐकून स्वाध्याय सोडवणे त्याचबरोबर स्पर्धा परीक्षा साठी आवश्यक असणारे, स्कॉलरशिप, नवोदय, यासाठी भरपूर प्रश्नांचा सराव करता येणार आहे. विद्यार्थी स्वतः एखादा घटक व्हिडिओच्या माध्यमातून समजून घेऊ शकतो. म्हणजेच विद्यार्थी स्वावलंबी बनतो. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण होते. अशा प्रकारची कोने ही वाडा तालुक्यातील पहिलीच संगणक शाळा आहे. ही संगणक शाळा मिळवण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्या .भक्ती वलटे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद पालघरच्या माजी सदस्या भक्ती वलटे, डॉ. भाई वलटे, वाडा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी उमेश सातपुते, विस्तार अधिकारी ठाकरे, पोलीस पाटील बाळकृष्ण दुपारे, प्रकाश वलटे, गायत्री पांढरे, भावना भगवान जाधव, बाळू दिवा , समीर नामदे, अल्ट्राटेक कंपनीचे मॅनेजर रमेश, केंद्रप्रमुख घनश्याम कांबळे, शाळेचे मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त महंत शिवरुपानंद स्वामी यांच्यावतीने विद्यार्थ्यांना ज्युस वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील कुंभेरेश्वर महादेव मंदीराचे प्रमुख व गरीब नागरिकांना मदतीचा हात देणारे महतं शिवरुपांनंद स्वामी यांच्यां वतीने स्वातंत्र्यदिनी विद्यार्थ्यांना ज्युसचे वाटप करण्यात आले.

आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन व ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मंहत शिवरुपांनंद स्वामी यांच्यां वतीने भिवंडी तालुक्यातील आंनद नगर बोरीवली, हरीपाडा दळेपाडा, शेरेकरपाडा, आन्हे, मोंहडुळ, बोरीवली (मराठी), हलवा पाडा, अंजुरफाटा, बंजारा वस्ती, दीवाणमाळ, मांगतपाडा, डोंगरपाडा, चिंबीपाडा, आन्हे, सोर, डोहोळे, कळंबोली, कोंशीबी, शिरगाव, तुळशी, पांढरीचा पाडा, कादंळी घोळबांव, खांडपे, चिंचवली, वांद्रे,या तर शहापुर कसारा येथील विहीरी पाडा, भगत पाडा, फणस पाडा, उबंरमाळी, पेठ्याचा पाडा, अंबापाडा, चाफेपाडा, कंरजपाडा, गोपाळपाडा, कुंडण, नेवाडे, ठाकुरपाडा, मुरवणे पाडा, खातीवली, फणसे पाडा या तसेच वाडा विक्रमगड पालघर मधील आसनस, साखरे, वाकी पाडा, शिरीषपाडा, कुहीलु, या जिल्हा परिषद शाळेसह, प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा खडवली, नवोदय विद्यामंदिर मोंहडुळ, भंडागे विद्यामंदिर वाकीपाडा, बि. वाय. पाटील विद्यालय आसनस, छत्रपती विद्यालय साखरे, न्यु इंग्लिश स्कूल वज्रेश्वरी, शारदा विद्यालय, आश्रमशाळा, पडघा, समतानगर आंगणवाडी, खडवली परिसरातील राया, ओझर्ली, या शाळेतील हजारो विद्यार्थ्यांसह राये, वांद्रे, दळेपाडा वज्रेश्वरी पालखी मंडळ, ओम साई, जय बजरंग, शेरेकरपाडा, धर्मवीर शंभुराजे, सुदर्शन नगर, गोंविद पथकांना ज्युसचे वाटप करण्यात आले यावेळी सर्व जिल्हा परिषद, प्राथमिक, माध्यमिक, अंगणवाडी शाळा, यांनी आभार पत्र देऊन शिवरुपांनंद स्वामी यांचे आभार मानले.

# खर्डी रेल्वे फाटकातील रस्ता दुरुस्ती करा : मनसेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : खर्डी-दळखण-जरंडी येथे ये-जा करण्यासाठी खर्डी रेल्वेस्थानकाजवळ असणाऱ्या फाटकाच्या रस्त्याची पूर्ण दुरावस्था झाली असून येथील रस्त्यावर मोठमोठी खडी उखडून वर आली असून रेल्वे रुळाच्या खाली गेल्याने मोटारसायकल व चारचाकी वाहने घसरत असून छोटे अपघात होत आहेत.दळखण येथे गणेशमूर्ती चा कारखाना असून खर्डी व परिसरातील गणेश भक्तांना हा रस्ता ओलांडून ये-जा करावी लागत आहे.10 दिवसांवर गणेशोत्सव आला असून येथून गणेशमूर्ती वाहनात आणतांना मूर्त्यांची तोडफोड होऊन विटंबना होऊ नये यासाठी रेल्वे प्रशासनाने येथील फाटकातील रस्ता तात्काळ दुरुस्त करून विघ्नहर्ता गणपती बाप्पांचे आगमन सुखकारक करावे अशी मागणी मनसेचे खर्डीस्टेशन अध्यक्ष मंगेश कुकडे यांनी निवेदनाद्वारे खर्डी रेल्वेस्थानकाच्या प्रबंधकाकडे केली आहे.यावेळी मनसेचे खर्डी विभागाध्यक्ष गणेश भोईर, सागर सुरोशी, सदानंद काकड, संदेश तेंडुलकर, कल्पेश धापटे व महेश हवालदार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शारदाबाई पवार विद्यालय आंबेगव्हाण येथे ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी शारदाबाई पवार विद्यालय आंबेगव्हाण येथे विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या संयुक्त ध्वजाचे ध्वजारोहण इयत्ता दहावी २०००-२००१ च्या बॅचची पहिली विद्यार्थिनी निशा भाऊसाहेब लंबे (सौ. निशा पोखरकर) यांच्या शुभहस्ते करण्यात आली. त्यानंतर ग्रामपंचायत ध्वजाचे ध्वजारोहण सरपंच अनिताताई डोके यांच्या हस्ते संपन्न झाले.

यानंतर विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यावरील प्रभावी भाषणे तसेच क्रांतिकारकांच्या शौर्याची आठवण करून देणारी देशभक्तीपर गीते सादर केली. उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.
शैक्षणिक गुणवत्तेत उत्कृष्ट यश मिळवलेल्या मार्च २०२५ च्या दहावी परीक्षेत प्रथम क्रमांकास १हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ५०० रुपये, तृतीय क्रमांकास ५०० अशी रोख पारितोषिके अशोक डोके व विलास मेंगाळ यांच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निशा पोखरकर होत्या. व्यासपीठावर सरपंच अनिताताई डोके, उपसरपंच राजेंद्र गायकर, माजी उपसरपंच दत्तात्रय गवांदे, पोलीस पाटील लक्ष्मीबाई कडाळी, मुख्याध्यापक माणिक बोऱ्हाडे, विश्राम गवांदे, दशरथ गायकर, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष मेंगाळ, महादेव गवांदे, रोहिदास सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थी व ग्रामस्थांना मिष्टान्न भोजन सरपंच अनिताताई डोके व पोलीस पाटील लक्ष्मीबाई कडाळी यांच्या वतीने देण्यात आले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्साहाने योगदान दिले.

### औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत
# विभाजन विभिषिका स्मृती दिन कार्यक्रम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : पद्मश्री सिंधुताई सपकाळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर यांच्या वतीने आयोजित विभाजन विभिषिका स्मृती दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

14 ऑगस्ट हा विभाजन विभिषिका स्मृती दिन म्हणून मानला जात असून या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तथा निवासी आश्रम शाळा, शेणवे यांनीही सहभाग घेतला होता. यामध्ये विभाजनाच्या काळातील ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्यावेळची सामाजिक, राजकीय आणि मानवतावादी संकटे याबाबत उपस्थित मान्यवर यांनी सविस्तर मार्गदर्शन करुन भारताच्या विभाजनामुळे झालेल्या विस्थापन, जीवितहानी आणि सांस्कृतिक धक्क्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

तसेच विद्यार्थ्यांना त्या काळातील घटनांचे वास्तव अधिक स्पष्टपणे समजून विभाजन विभिषिका स्मृती दिनाविषयी अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष चित्रपट व व्हिडिओ सादर करण्यात आल्या तर यावेळी विद्यार्थ्यांनी देशाच्या ऐक्य, एकात्मता आणि बंधुभाव टिकवून ठेवण्याची शपथ घेतली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घटनांमधून शिकून पुढील पिढ्यांसाठी योग्य मूल्ये रुजवण्याचे आवाहन प्राचार्य प्राचार्य राम अण्णासाहेब हिरे यांनी आपल्या मनोगतातून केले. यानंतर उपस्थित सर्वांनी 1 मिनिट मौन पाळून विभाजनाच्या काळात हौतात्म्य पत्कारल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर प्राचार्य राम अण्णासाहेब हिरे, तर प्रमुख वक्ते म्हणून राजेश खांडे, दिपिका माळी यांच्यासह शिक्षक -शिक्षिकेतर, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्वेता साळुखे यांनी तर आभारप्रदर्शन शिक्षक जिवन पाटील यांनी मानले.

# डोंबिवली रिक्षा चालकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली वेस्ट, आणि लाल बावटा रिक्षा युनियन, सिटीजन वेल्फेअर असोसिएशन, यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवलीतील रिक्षा चालकांसाठी भव्य आरोग्य तपासणी शिबिर दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत कॅनरा बँकेसमोर आयोजित केले होते.
या आरोग्य तपासणी शिबिरात रक्तदाब तपासणी डोळ्यांची तपासणी रक्तातील साखर अशा अनेक वैद्यकीय तपासण्या या शिबिरात समाविष्ट होत्या.महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि पंतप्रधान आयुष्यमान भारत जन आरोग्य योजनेमार्फत मोफत शस्त्रक्रिया मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून वैद्यकीय निधी मदत या सर्वांसाठी विनामूल्य आहे.
अध्यक्ष लक्ष्मी चावली प्रकल्प प्रमुख अतुल केतकर सचिव वनिता आंग्रे,यालेसेनियाग्रस्त बालकांसाठी रक्तदान शिबिर सुद्धा आयोजित करण्यात आले होते.
अध्यक्ष लक्ष्मी चावली प्रकल्प प्रमुख गीता कुलकर्णी सचिव वंचिता आंग्रे अध्यक्ष कॉम्रेड काळू कॉमसकर कार्याध्यक्ष कॉम्रेड राजू परांजपे सचिव कॉम्रेड प्रवीण पाटील उपाध्यक्ष कॉम्रेड अरुण वेलस्कर इत्यादी आयोजक आणि कार्यकर्त्यांमुळे हे शिबिर यशस्वी विचार पार पडले.

# विश्व हिंदू परिषदेच्या नवीन कार्यालय उद्घाटनप्रसंगी विविध कार्यक्रमांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : विश्व हिंदू परिषदेचा स्थापना दिवस व ग्राम विकास योजना कार्यालयाचे उद्घाटन रविवार 17 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित करण्यात आले असून यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी 09:30 वाजता श्री सत्यनारायणाची महापूजन , आरती आणि तीर्थप्रसाद,सकाळी “विश्व हिंदू परिषद वर्धापन दिवसाचे महत्व व कार्याचा आढावा कोकण प्रांत मंत्री मोहन सालेकर करणार असून दुपारी 12:30 नंतर “महाप्रसादाची सोय केली आहे.तसेच दुपारी 01:00 वाजता कीर्तनकार ह. भ. प. वामन महाराज भोईर, मोहपाडा, खालापूर यांचे सुश्राव्य कीर्तन असल्याने या श्रवण सुखाचा लाभ पेण शहर व ग्रामीण नागरिकांनी घ्यावा असे प्रवीण शाह अध्यक्ष, वि.हि.प. कुलाबा जिल्हा,दिनेश तहिलयानी अध्यक्ष शीव कल्याण केंद्र यांनी केलेआहे.कार्यक्रमाचे ठिकाण प्लॉट नं 677, म्हाडा कॉलनी, पेण, जिल्हा रायगड असून संपर्क प्रभुदास घरत 95959 30591 यांच्याशी साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### विज वितरण कंपनीच्या अनागोंदी व मनमानी कारभाराविरोधात
# धसई कार्यालयावर नागरिकांचा निषेध मोर्चा!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र राज्य विजवितरण कंपनीच्या अनागोंदी व मनमानी कारभाराला धसई, शिरोशि, टोकावडे, सरळगाव विभागातिल नागरिक कंटाळले असून येत्या सोमवारी 18 ऑगस्टला सकाळी 11 वा. मुरबाड तालुक्यातील धसई कार्यालयावर नागरिकांचा निषेध मोर्चा निघणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने कधीही विज पुरवठा खंडित करने,सतत लाईट जाणे, कमी विजदाब मिळणे,चुकीच्या पद्धतीने अवाजवी विज बिल ग्राहकांना देणे, बंदच्या नावाखाली पुर्ण दिवस लाईट घालवणे, जुने जीर्ण झालेले,सडललेले विजेचे खांब ,तसेच तारा न बदलणे असे अनेक प्रश्न घेऊन या परिसरातील नागरिक हा निषेध मोर्चा काढणार आहेत.

या विज वितरण कंपनीचा त्रास सर्व सामान्य नागरिक, शेतकरी , छोटे उद्योजक, व्यापारी, शालेय विद्यार्थी,गृहिणी यांना होत असून या संबधात महावितरणच्या अधिकार्यांना गेले वर्षभर अर्ज, विनंत्या, लेखि पत्रव्यवहार करून सुद्धा महावितरणचे अधिकारी कोणतिही दखल घेत नाही म्हणून महावितरणच्या मनमानी व अनागोंदी कारभारा विरोधात निषेध मोर्चाचे आयोजन केले असुन तशा प्रकारचे लेखी निवेदन टोकावडे पोलीस स्टेशनसह ईतर विभागाला दिले आहे..

> गेले अनेक महिने धसई परिसरात नागरिकांना विजेच्या समस्येचा त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी अधिकारी, कर्मचारी यांना अनेकदा लेखी विनंती , पत्रव्यवहार केले आहेत परंतु महावितरणचे अधिकारी कोणतिही दखल घेत नाही म्हणून विज वितरण कंपनीच्या विरोधात या निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सामिल व्हावे
> - सुभाष (आप्पा) घरत , माजी जिल्हा परिषद सदस्य.

# स्वाध्याय परिवाराच्या सहभागातून पथनाट्यांद्वारे जन्माष्टमी साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : वैश्विक स्वाध्याय कार्याचे प्रवर्तक पद्मविभूषण पांडुरंगशास्त्री आठवले (दादा) यांच्या प्रेरणेने स्वाध्याय परिवारातील युवा वर्ग श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव दरवर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करतो. भगवान श्रीकृष्णाची जयंती केवळ दहीहंडी फोडून न करता त्याचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावेत म्हणून दादांनी युवकांना पथनाट्याची संकल्पना दिली. दादांची सुपुत्री आणि स्वाध्याय परिवाराची धुरा सांभाळणाऱ्या श्रीमती धनश्री श्रीनिवास तळवलकर (दीदी) यांच्या मार्गदर्शनाने पथनाट्याच्या माध्यमातून लाखो युवक देशविदेशात हे विचार घेऊन जात आहेत. जन्माष्टमी निमित्त सादर होणाऱ्या या पथनाट्यांचा हा प्रयोग गेली २३ वर्षे निरंतर सुरू आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात युवा विभागातून अनेक पथनाट्याच्या टीम गावागावांत श्रीकृष्णाचे विचार देऊन आगळीवेगळी जन्माष्टमी साजरी करीत आहेत

यंदा देशभरातील १५ राज्यांत तसेच इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, सिंगापूर, बँकॉक, आखाती देश यांसारख्या विविध २० पेक्षा जास्त देशांत मिळून युवकांच्या जवळपास १७हजार टीम्स मधून साधारणतः पावणे दोन लाख युवक 'मिल गई मंज़िल हमें' या पथनाट्यातून सर्वांना विचार करण्यास प्रवृत्त करणार आहेत. विविध भाषांमधून ही पथनाट्ये १० ऑगस्ट ते १७ ऑगस्ट, २०२५ या काळात सादर होत आहेत. विशेष म्हणजे कोणत्याही प्रलोभनाशिवाय, अत्यंत निरपेक्षपणे आपलं शिक्षण, नोकरी, व्यवसाय सांभाळून आणि या सर्वांतून वेळ काढून हे युवक पथनाट्य सादर करतात.

आपण सुखाच्या शोधात आयुष्यभर फिरतो परंतु नेहमी सुख आपल्या बाहेर शोधतो. बहुतेकवेळा सुख नक्की कशात आहे हे आपल्याला समजतच नाही. पण विश्व चालवणारी शक्ति आपल्यामध्ये वसली आहे आणि ती शक्ति माझ्या हृदयात राहून मला प्रेमाने सांभाळते, ही समजूत आली तर माणूस सुखाच्या पाठीमागे व्यर्थ पळणार नाही. त्या हृदयस्थ भगवंताच्या जाणिवेमुळे आपला जीवनाचा प्रवास निश्चित सुखाचा होईल, असा काही संदेश हे पथनाट्य देते. आज दुर्दैवाने जन्माष्टमी फक्त दहीहंडीची उंची, थर आणि त्यासाठी लाखोंची बक्षिसे इतक्यावरच सीमित झाली आहे. श्रीकृष्ण आणि त्यांचे विचार जन्माष्टमी उत्सवातकुठे दिसतच नाहीत. अशा विपरीत काळात स्वाध्याय परिवाराच्या युवकांची जन्माष्टमी निमित्त प्रतिवर्षी सादर होणारी ही पथनाट्ये काहीतरी सकारात्मक आणि रचनात्मक करण्याचा प्रयास करतात.

# उप विभागीय सहनिबंधक मिलिंदसेन भालेराव यांचा गौरव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शासनाचे १०० दिवस कार्यक्रमामध्ये कोकण विभाग सह निबंधक कार्यालयाला राज्यात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल १५ ऑगस्ट रोजी मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री, ठाणे जिल्हा एकनाथ शिंदे यांच्या शुभ हस्ते कोकण विभागाचे सह निंबधक मिलिंद सेन भालेराव यांना त्यांच्या सहकाऱ्यांसह पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
कुटुंबासोबत वेळ घालवाल. आनंदाचे वातावरण निर्माण होईल. आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील आणि तुमचे अनुसरण करतील.

**वृषभ**
सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल. विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.

**मिथुन**
तुम्ही जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल, यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**कर्क**
तुमचे आरोग्य चांगले राहील.महिलांसाठी आजचा दिवस चांगला आहे जे कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत आहेत. काम करताना घाई करू नका.

**सिंह**
व्यवसायात चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू मजबूत होईल. नवीन जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर घरातील ज्येष्ठांचे मत अवश्य घ्या.

**कन्या**
राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे, समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते. नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे.

**तूळ**
तुम्ही आव्हानांचा सामना कराल, तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस सामान्य असेल.

**वृश्चिक**
कामाबाबत काही नवीन कल्पना मिळू शकतात. तुम्ही त्यांच्यावर लवकरच काम सुरू करू शकता. अभियंत्यांसाठी दिवस फायदेशीर असणार आहे.

**धनु**
विद्यार्थ्यांसाठी दिवस समाधानकारक असेल, त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल. तुम्हाला एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल.

**मकर**
घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल आणि व्यवहारही जलद होऊ शकतात. एखादी मोठी जबाबदारी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**कुंभ**
करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते परंतु योग्य बिंदू निवडणे चांगले होईल. आई-वडिलांचा आशीर्वादने सर्व अडचणी दूर होतील.

**मीन**
करिअरमधील चढ-उतारांमुळे तुम्ही त्रस्त असाल, परंतु काही अनुभवी वरिष्ठांच्या मदतीने तुम्हाला आराम मिळेल.घरात मुलांसोबत चांगला वेळ घालवाल.



## भिवंडी मनपाच्या श्री. अनंता भोई वाहनतळाची आयुक्तांकडून पहाणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अनंता भोई वाहनतळाची आयुक्तांकडून पहाणी करण्यात आली. महानगरपालिकेचे वाहनतळ यापुर्वीच सुरू करण्यात आले होते. मात्र सदर वाहनतळाचा वापर होत नव्हता. ज्यामुळे शहरामध्ये वाहने रस्त्याच्या कडेला लावल्याने रस्त्यावर वाहतूक कोंडी होत होती. यावेळी आयुक्तांनी स्वत: वाहनतळाची पावती घेऊन नागरीकांनी देखील आपली वाहने महानगरपालिकेच्या वाहनतळात पार्कींग करावे असे आवाहन केले आहे. तसेच अजय नगर, खाडीपार रोड, नझराना सिनेमा हॉल, तिनबत्ती नाका, मिनाताई ठाकरे रंगायतन इ. ठिकाणी रस्त्यावर नो पार्कींग क्षेत्रात गाडी पार्क केल्यास दंडात्मक कारवाई करण्यांत येईल असे ही त्यांनी नमुद केले. याप्रसंगी मा.अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, उपायुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, अति. शहर अभियंता श्री. सचिन नाईक, सहाय्यक आयुक्त नितीन पाटील, विभाग प्रमुख श्री. स्नेहल पुण्यार्थी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे
# ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात आज ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन समारोह आयुक्त अभिनव गोयल यांचे शुभहस्ते ध्वजारोहणाने संपन्न झाला. यावेळी मा. आमदार राजेश मोरे ,महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड ,शहर अभियंता अनिता परदेशी आणि महापालिकेतील इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.यावेळी राष्ट्रगीत गायनानंतर, राज्य गीताची ध्वनिफीत वाजविण्यात आली. तद्नंतर हुतात्मा स्मारकास वंदन करण्यात आले.



यावेळी 27 गावातील कर्मचारी वर्गापैकी एका कर्मचा-यास प्रातिनिधिक स्वरूपात महापालिकेतील समावेशनाचा आदेश महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते देण्यात आला. त्याचप्रमाणे अग्निशमन विभागात कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या कै. मधुकर कांबळे यांच्या पत्नी पौर्णिमा कांबळे यांस सदनिकेच्या रकमेएवढा धनादेशही आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते प्रदान करण्यात आला .महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत उत्तीर्ण झालेल्या नवसाक्षरांपैकी एका नवसाक्षर व्यक्तीस प्रमाणपत्राचे वितरण आयुक्त यांचे हस्ते करण्यात आले .

महापालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालय आणि सोनोग्राफी सेंटर यांच्या नोंदणी, नूतनीकरण कार्यपद्धती ऑनलाइन स्वरूपात होणार असून या कार्यपद्धतींचा SOP देखील आयुक्तांच्या हस्ते IMA कल्याणच्या अध्यक्ष डॉ. सुरेखा ईटकर व डॉ. प्रशांत पाटील यांस सुपूर्द करण्यात आल्या. त्याचप्रमाणे आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मिशन शक्ती कर्करोगमुक्त महिला अभियानाच्या लोगोचे अनावरण तसेच या अभियानांतर्गत आशा सेविकांच्या रॅलीचा प्रारंभ आयुक्तांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. त्याचप्रमाणे नव्याने प्राप्त होणाऱ्या ११ रुग्णवाहिकांपैकी ६ रुग्णवाहिकांचे लोकार्पणही आयुक्त यांचे हस्ते करण्यात आले .

महापालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांचे शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपायुक्त रमेश मिसाळ कार्यकारी अभियंता मनोज सांगळे ,सहा. आयुक्त हेमा मुंबरकर, राजेश सावंत तसेच इतर अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

तद्नंतर डोंबिवली येथील वै.ह.भ.प. सावळाराम महाराज म्हात्रे क्रिडा संकुलातील कॅ. विनयकुमार सचान स्मारकास महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कॅप्टन विनयकुमार सच्चान यांचे बंधू, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे शहर अभियंता अनिता परदेशी तसेच महापालिकेचे इतर अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

तदनंतर डोंबिवली पूर्वेतील दत्तनगर चौक येथील दीडशे फुटी उंच ध्वजाचे ध्वजारोहण महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. "हर घर तिरंगा म्हणजेच घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत दोन ऑगस्ट पासून विविध कार्यक्रम महापालिकेमार्फत करण्यात येत आहे आपल्या मनात देशभक्तीची भावना दृढ झाली पाहिजे ,आपले जवान, सैनिक आपल्या रक्षणासाठी काम करीत असतात, आपणही नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडूया असे सांगत आयुक्त अभिनव गोयल यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त उपस्थित असलेल्या मान्यवरांना तसेच नागरिकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मा.आमदार राजेश मोरे, माजी पदाधिकारी शरद गंभीरराव इतर मान्यवर ,महापालिका अधिकारी, कर्मचारी वरिष्ठ पोलीस अधिकारी ,नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## ठाणे महापालिकेच्यावतीने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



### सफाई कर्मचारी गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन ठाणे महानगरपलिकेच्यावतीने मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. ठाणे महानगरपालिकेचे सुरक्षा दल, अग्निशामक दल आणि टीडीआरएफ यांच्या जवानांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

ध्वजारोहण सोहळ्यास अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरिश झळके यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी आणि महापालिकेचे कर्मचारी, गुणवंत कामगारांचे कुटुंबीय, नागरिक उपस्थित होते.

त्यानंतर, ठाणे शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देणाऱ्या १० प्रातिनिधिक सफाई कर्मचाऱ्यांचा तसेच एका स्वच्छता गटाचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल गुणवंत कामगार पुरस्कार देऊन आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. त्यात, अंजना विजय खिलारे, पुजा अविनाश कोटीयन, पुष्पा दादा बनसोडे, भारती किशन चिमटे, उज्जैन रतन पाटील, विलास बाबाजी मढवी, पुरुषोत्तम जान्नप्पा पुजारी, शंकर नरसप्पा हनुमंता, अरुण गोपीनाथ पाटील, पोपट निवृत्ती केंगार या कर्मचाऱ्यांचा समावेश होता. तसेच, खारटन रोड हिराकोट येथील खूप जुनी व मोठी कचरापेटी कायमस्वरुपी बंद करण्यासाठी मेहनत घेणाऱ्या उप मुख्य स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी, स्वच्छता निरीक्षक संजू रणदिवे, मुकादम विठ्ठल किर्तने, सुपरवायझर शिवाजी पाटील यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी, उपायुक्त (घनकचरा) मनीष जोशी आणि आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे उपस्थित होते.

याप्रसंगी, आयुक्त राव यांनी नागरिकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. ठाणे स्वच्छ ठेवण्यासाठी मेहनत घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना बदलत्या ठाण्यातील त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्याचा उद्देश असल्याचेही आयुक्त राव यांनी नमूद केले.

ध्वजारोहणानंतर महापालिका भवन येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात राष्ट्रपुरूषांच्या प्रतिमांना, तसेच महनीय व्यक्तींच्या शहरात विविध ठिकाणी असलेल्या पुतळयांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

घरोघरी तिरंगा अभियान -२०२५

'घरोघरी तिरंगा २०२५' या अभियानाच्या निमित्ताने, ठाणे महापालिकेच्यावतीने ०९ ऑगस्टपासून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला, निबंध या स्पर्धा, तिरंगा यात्रा, सायकल रॅली, देशभक्तीपर गीत आणि नृत्य यांचा कार्यक्रम, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा स्वाक्षरी, तिरंगा सेल्फी आदी उपक्रमांचा समावेश होता. या निमित्ताने घेण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत ११ जुन्या कचऱ्याच्या जागा साफ करून तेथे कचरा टाकणे बंद करण्यात आले.

## एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद संस्थेचा सन्मान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या वतीने जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय व देदीप्यमान कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा भव्य-दिव्य असा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर पुरस्कार सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार नरेश म्हस्के साहेब, ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (आय.ए.एस) साहेब यांच्या शुभहस्ते शहापूर तालुक्यातील स्वामी विवेकानंद संस्था पाली या संस्थेला महाराष्ट्र क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे द्वारा ठाणे जिल्हा युवा संस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी साहेब (आय.पी.एस.), ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे साहेब, तहसीलदार डॉ. संदीप माने साहेब, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, मेरा युवा भारत ठाणे जिल्हा युवा अधिकारी मनीषा शर्मा, राज्य युवा पुरस्कार सन्मानित अजित कारभारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर जिल्हा युवा संस्था पुरस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर, सचिव संजय तरणे, संस्थेचे हितचिंतक प्रकाश गोंधळी, दिलीप भोईर, बाळाराम भोईर, शर्वरी तरणे, रत्नदीप म्हसकर, आकाश म्हात्रे यांनी स्वीकारला.

"स्वामी विवेकानंद संस्था गेली २८ वर्षे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व आरोग्य पर्यावरण संरक्षण व संवर्धन, युवा व महिला विकास आदी क्षेत्रात निस्वार्थपणे व प्रामाणिकपणे मोलाचे कार्य करत असून संस्थेच्या आम्हां सर्व पदाधिकारी व सदस्यांना याचा सार्थ अभिमान वाटतो. या पुरस्काराच्या रूपाने आम्हांला संस्थेचे हे देशसेवेचे कार्य पुढे नेण्यासाठी प्रेरणा मिळाली असून खूप आनंद होत आहे. यापुढेही संस्थेच्या माध्यमातून आम्हीं सर्व समाजविकास व राष्ट्रविकासासाठी असेच भरीव कार्य करत राहू," असे स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांनी पुरस्कार स्वीकारताना म्हटले. आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्थेला शासनातर्फे सदर ठाणे जिल्हा युवा संस्था पुरस्कार मिळाल्याने संस्थेचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

## उल्हासनगर महानगरपालिकेत स्वातंत्र्य दिन संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : सालाबादप्रमाणे यावर्षी स्वातंत्र्य दिनाचा ७९ वर्धापन दिन समारंभ १५ ऑगस्ट, २०२५ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेत साजरा करण्यात आला. सकाळी ८:१५ वाजता मा. प्रशासक तथा आयुक्त मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांचे हस्ते धजारोहण करण्यात आले. येथील महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

मा. आमदार कुमार आयलानी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सर्व उपस्थीत मान्यवर, महापालिका प्रशासक तथा आयुक्त, महापालिका अधिकारी व कर्मचारी यांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली. स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण करुन देशासाठी प्राणाचे बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक हरिश्चंद्र जनार्दश जोशी यांचे नातेवाईक रमेश हरिश्चंद्र जोशी व श्री. नेवादराम विशाराम नागदेव यांची कन्या भागी नेवादराम नागदेव यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.



तिरंगा मपधेचे अनुकरण करून सर्व नागरिकांनी देशाप्रती आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून आपले कर्तव्य करपणेचे आवाहन मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी उपस्थितांना केले व स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या

महापालिकेच्या प्रांगणात तिरंगा कॅनव्हॉसची व्यवस्था करण्यात आली होती, सदर कॅनव्हॉसवर घरोघरी तिरंगा व हर घर तिरंगा लिहून उपस्थितांनों देशाप्रती आपला आदर व्यक्त केला. महापालिका संवेदावत असलेल्या ऑनलाईन RTS सर्विसचे उद्घाटन करण्यात आले.

"गोलमैदान येथील ११० फुटी उंच राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यासाठी मुख्यालयातून महापालिका तिरंगा रैली काढण्यात आली. सदर ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर लेझीम नृत्य सादर केले. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले. विविध स्पर्धेत सहभाग घेवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमाक क्रमांक आलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र, शॉल व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. सहा. आयुक्त (१) तथा जनसंपर्क अधिकारी श्री. अजय साबळे यांचेमार्फत उपस्थितांचे अभार प्रदर्शन करण्यात येवून कार्यक्रमीची सांगता करण्यात आली.

सदर समारंभास मा.आमदार कुमार आयलानी, महापालिका मा.प्रशासक तथा आयुक्त मनिषा आव्हाळे (मा.से.) अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस, अतिरिक्त आयुक्त धीरज चव्हाण, उप आयुक्त (१) विशाखा मोटघरे, उप आयुक्त (२) डॉ. दिपाली चौगले, उप आयुक्त (३) अनंत जवादवार, उप आयुक्त (४) स्नेहा करपे, मुख्य लेखाधिकारी अभिजीत पिसाळ, सहा. आयुक्त (१) तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे, सहा. आयुक्त सलोनी निवकर, सहा. आयुक्त गणेश शिंपी, अलका पवार, विशाल कदम, तसेच माजी महापालिका सदस्य. राजेश यधरिया, नाना बागुल, किशोर बनवारी, भगवान मालेराव, .जनमुदास पुरस्वानी, सिंधी साहित्य आकादमीचे पूर्व कार्याध्यक्ष महेश शुक्रामनी, समाज सुधारक. राजू तेलकर, भांडार विभाग प्रमुख. अंकुश कदम, सुरक्षा रक्षक, अग्निशमन दलातील जवान, वैद्यकीय पथक, पत्रकार ,NGO व इतर महापालिका अधिकारी व कर्मचारी व महापालिका शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व शालेय विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थीत होते, सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहा. आयुक्त (१) तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे व महापालिका शाळेचे शिक्षक भास्कर शिंदे यांनी केले.

## जीवनदीप महाविद्यालय खर्डी येथे स्वातंत्र्य दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे व महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्राचार्य कळकटे यांनी मार्गदर्शन करताना, "सर्वांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून कर्तव्य पार पाडावे," असे सांगितले. प्रा. दिप्ती मोरे यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हार्दिक पाटील याने ध्वजारोहणाचे संचलन केले. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर करून उपस्थितांना भारावून टाकले.

या सोहळ्यास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने दुमदुमला होता.

## जिल्हा परिषद ठाणे येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा परिषद, ठाणे येथे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला. राष्ट्रध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत व राज्यगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान जिल्ह्यात उत्साहात साजरे करण्यात आले. या निमित्ताने जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी यांनी तिरंगा प्रतिज्ञा, तंबाकू मुक्त शपत, अवयव दान शपत घेतली.



या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. वल्लभ जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, कार्यकारी अभियंता बांधकाम पद्माकर लहाने, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रकाश सासे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, कृषी विकास अधिकारी एम.एम. बाचोटिकर, कार्यकारी अभियंता सर्व शिक्षा अभियान युवराज कदम यांसह इतर सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

## जीवनदीप महाविद्यालयात स्वातंत्र्य दिवस उत्साहात पार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : संपूर्ण भारतात अतिशय उत्साहात आणि जोशात त्याचबरोबर तितक्याच सन्मानपूर्वक पद्धतीने साजरा केला जाणारा सर्व भारतीयांचा राष्ट्रीय सण म्हणजे स्वातंत्र्य दिन. दिनांक १५- ०८- २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे ७९ वा स्वातंत्र्य दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, विधी महाविद्यालय, तसेच निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल या चारही ज्ञान संकुलांनी एकत्र येत भारताचा ७९ वा स्वातंत्र दिन साजरा केला. सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी ध्वजारोहण केले व त्यानंतर ध्वजगीत, राष्ट्रगीत व महाराष्ट्र राज्याचे राज्य गीत सादर करण्यात आले. स्काऊट गाईड व NCC च्या विद्यार्थ्यांनी परेड सादर केली.

या कार्यक्रम प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, विधी महाविद्यालय प्राचार्य. रिजवानी सर, कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य. प्रकाश राहणे ,वरिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल मुख्याध्यापिका भावना कुंभार हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. निर्मल स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर भाषणे केली. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या वक्तव्यातून देशा प्रतीचे आपले कर्तव्य पटवून सांगितले; त्याचबरोबर देशभक्तीपर गीत सादर करण्यात आली. प्राचार्य डॉ.अशोक वाघ यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वकृत्व केल्याने कौतुक केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नरेश टेंभे यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, NSS स्वयंसेवक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थिती सदर स्वातंत्र दिनाचा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

## अर्पण रोटरी थॅलेसेमिया सेंटरचा लोकार्पण समारोह संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रोटरी क्लब ऑफ सेंट्रल कल्याण आणि अर्पण थॅलेसेमिया व सिकल सेल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने अर्पण रोटरी थॅलेसेमिया सेंटरचा लोकार्पण समारोह आज संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्यास महापालिका आयुक्त अभिनव गोयल ,अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी ,महापालिकेचे उपायुक्त, महापालिका सचिव, महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ दीपा शुक्ल ,इतर अधिकारी वर्ग, महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी कर्मचारी तसेच मान्यवर उपस्थित होते.




आतापर्यंत ही सुविधा महापालिकेमार्फत दिली जात नव्हती, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी ठाणे व इतरत्र जावे लागत होते. आता या सेंटरमुळे आपण अशा रुग्णांना चांगल्या सुविधा पुरवू शकू असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी केले. आजाराशी संघर्ष करत लढणारे हे रुग्ण आपल्या जीवनास प्रेरणा देतात ,या सेंटरमुळे अशा रुग्णांचे कष्ट आपण थोड्या प्रमाणात कमी करू शकू असे ते पुढे म्हणाले तसेच ह्या सेंटरचे उद्घाटन आपण जरी केले असते तरीही सेंटर चालवणे ही मोठी जबाबदारी आहे असे ते आपल्या भाषणात म्हणाले,यावेळी त्यांनी या ठिकाणी पुरविण्यात आलेल्या सुविधांची पाहणी करून तेथे असलेल्या रुग्णांशी स्वतः संवाद साधला.

**हे सेंटर रुग्णांसाठी वरदान देणारे ठरेल असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गायकवाड यांनी आपल्या भाषणात काढले.**

हे सेंटर रुग्णांसाठी वरदान देणारे ठरेल असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गायकवाड यांनी आपल्या भाषणात काढले. थॅलेसेमिया असणाऱ्या रुग्णांना काय अडचणी जाणवतात याची माहिती महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.

थॅलेसेमिया हा एक अनुवंशिक आजार असून तो पालकांमधून मुलांमध्ये संक्रमित होतो ,यावर उपचार म्हणजे नियमित रक्त संक्रमण. हा आजार असलेल्या रुग्णांना दरमहा त्यांच्या रक्तातील हिमोग्लोबिनच्या प्रमाणानुसार रक्त संक्रमण करावे लागते. आता बाई रुक्मिणी बाई रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावर थॅलेसेमिया केंद्र उभारण्यात आलेले असून त्यामध्ये एकाच वेळी सहा रुग्णांवर उपचार करणे शक्य आहे. सदर ठिकाणी विशेषज्ञ, रक्तपुरवठा व इतर आवश्यक मनुष्यबळ अर्पण रक्तपेढीमार्फत उपलब्ध होणार असून थॅलेसेमियाच्या रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येणार आहेत. त्यासाठी वेळोवेळी रक्तदान शिबिर रोटरी क्लब ऑफ सेंट्रल कल्याण मार्फत आयोजित करण्यात येणार आहे. हे सेंटर साकारण्यासाठी रोटरी क्लब ऑफ सेंट्रल कल्याणचे प्रेसिडेंट रवींद्र कुर्हाडे, संजय भोळे, धनंजय पाटील, अनंत देवरे आणि अर्पण थॅलेसेमिया आणि सिकल सेल सोसायटीच्या डॉ. वर्षा उगावकर, अनिल आडेवार, साक्षी मोरे यांनी विशेष प्रयत्न केले.

# खेळातून घडवा जीवनमूल्ये - कुलगुरु डॉ.रवींद्र कुलकर्णी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : "खेळ हा केवळ स्पर्धेचा मंच नाही, तर जीवनमूल्ये, शिस्त आणि नेतृत्वगुण घडविण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. क्रीडाशिक्षकांनी ही जबाबदारी ओळखून विद्यार्थ्यांना मैदानावरूनच जीवन शिकवावे," असा प्रेरणादायी संदेश मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी दिला. ते डेरवण येथील एसव्हीजेसीटी क्रीडा संकुलात संपन्न झालेल्या चौथ्या क्रीडाशिक्षक कार्यशाळा व चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

मुंबई विद्यापीठ क्रीडा विभाग आणि एस.एस.टी. कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या चार दिवसीय कार्यशाळेत २०० पेक्षा अधिक क्रीडाशिक्षकांनी सहभाग नोंदवला. विविध क्रिडा प्रकारांचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय क्रीडा नियम, खेळातील आधुनिक तंत्रज्ञान, क्रीडा मानसशास्त्र, फिटनेस आणि पोषण आहार इ.विषयांवर तज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

समारोप सोहळ्यास मुंबई विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. मनोज रेड्डी, एसव्हीजेसीटी क्रीडा संचालक डॉ. श्रीकांत पराडकर, सिनेट सदस्य डॉ. विश्वंभर जाधव, तसेच एस एस टी महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी, उपस्थित होते. कार्यशाळेतील काटेकोर नियोजन, सत्रांचे दर्जेदार आयोजन आणि आदरातिथ्याबद्दल सहभागी शिक्षकांनी एस एस टी महाविद्यालयाचे विशेष कौतुक केले. या कार्यशाळेचे यशस्वी समन्वयन प्रा. राहुल अकुल आणि प्रा. पुष्कर पवार यांनी केले.

## भाजपा महायुतीच्या वतीने
# धसई येथे तिरंगा रॅली




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : भारतीय स्वातंत्र्याच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आज मुरबाड तालुक्यातील धसई येथे भाजपा महायुतीच्या वितिने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र शासनाच्या" हर घर तिरंगा" या मोहिमे अंतर्गत 13,14,व 15 ऑगस्ट रोजी सर्व शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांमध्ये हे अभियान राबविले जात असून देशाप्रति प्रेम, त्याग,समर्पण, निष्ठा, आदर नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी स्वातंत्र्याचे महत्व देशातील नागरिकांमध्ये अधिक दृढ व्हावे,तरुणांमध्ये समर्पित भावना निर्माण होण्यासाठी हे अभियान उपयुक्त आहे.

मुरबाड तालुका भाजपा महायुतीच्या वतीने मा.महसूल मंत्री लोकनेते स्व. शांताराम भाऊ घोलप यांच्या धसई गावातिल धसई सेवा सोसायटीच्या कार्यालया पासून ते स्व.शांताराम घोलप चौकापर्यंत या तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते. मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे, तहसीलदार अभिजित देशमुख, जनता विद्यालयाचे विद्यार्थी, महायुतीचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी विद्यार्थी व रॅलीत उपस्थितांनी स्वातंत्र्य दिनाच्या घोषणा देऊन वातावरण दुमदुमून सोडले.

यावेळी आमदार कथोरे यांनी उपस्थित रलिला संबोधित करताना देशासाठी हा दिवस आनंदाचा, अभिमानाचा असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंधुर यशस्वी करून जगात देशाचे नाव उंच केले आहे. याजबरोबर व्यसनमुक्त व शिविमुक्त शाळा अभियान आपण सध्या राबवित असून अनेक तरूण आज नशेच्या आहारी जात आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे त्यासाठी जनजागृती होणे गरजेचे असून धसई येथिल स्व.शांताराम भाऊ घोलप चौकाचे ताबडतोब सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधित विभागाला देऊन रॅली चे नियोजन उत्तम प्रकारे केल्याबद्दल आयोजकांना धन्यवाद दिले.तर तहसीलदार अभिजित देशमुख यांनी नागरिकांना शुभेच्छा देऊन सर्वांनी ध्वज संहितेचे पालन करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले.तर या रॅलीचे नियोजन भाजपाचे पुर्व मंडळाचे अध्यक्ष दिपक पवार, राष्ट्रवादीचे ता.अध्यक्ष चंद्रकांत बोस्टे, शिवसेनेचे तालुका प्रमुख कांतिलाल कंटे, रिपाईचे अध्यक्ष दिनेश उघडे यांच्यासह महायुतीच्या वतीने करण्यात आले होते.

## पडघा येथील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात
# अंमली पदार्थ सेवन विरोधात जनजागृती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात पोलीसांकडून आंमली पदार्थ सेवन विरोधात जनजागृती करण्यात आली.

पडघ्यात ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी पडघा जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात पडघा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच नयना जाधव यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. तर ग्रामपंचायत प्रांगणात सरपंच रविंद्र विशे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला यावेळी ग्रामपंचायत सदस्यासह नागरीक व ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे उपस्थीत होते. यावेळी आंमली पदार्थाचे सेवन केल्याने होणारे दुष्परिणाम यांचे फलक पोलीस, नागरीकांकडुन विद्यार्थ्यांकडून झळकावण्यात आले तर यावेळी पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक दिलीप देशमुख यांनी आमली पदार्थ सेवन केल्याने मानवी जिवनावर, मनावर, शरीरावर, तरुणाईवर, समाजावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती दिली तसेच आंमली पदार्थ विक्री व त्यासंबंधी कुणाला काही माहिती पोलिसांना द्यायची असल्यास त्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असल्याचे पोलीसांकडून सांगण्यात आले.यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले तर नागरीकांसाठी अल्पोपहार, पिण्याचे पाणी, चहाची व्यवस्था करण्यात आली होती.


# गाडगे महाराज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इस्त्रो स्पेस सेंटरला भेट



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जुन्नर : गाडगे महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अहमदाबाद (गुजरात) येथील इसरो स्पेस एक्झिबिशन सेंटरला शैक्षणिक भेट दिली. या बद्दल माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली. या अभ्यासदौऱ्याचे आयोजन एरोस्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, पुणे व श्रीमंतयोगी सुवर्ण स्मारक ट्रस्ट, जुन्नर तसेच आमदार शरद सोनवणे यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते ७ ऑगस्ट दरम्यान करण्यात आले होते. या दौऱ्यात विद्यालयातील कार्तिकेय प्रशांत कुतळ व स्वराली भावेश अहिनवे यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी या भेटीत सॅटॅलाइट थ्रीडी सोलर सिस्टम मॉडेल, रॉकेट इंजिन मॉडेल, सौर यंत्रणेवरील प्रकाशध्वनी शो, चंद्रयान-३ मोहीम याबरोबरच गुजरात सायन्स सिटी, आडालज स्टेप वेल, अक्षरधाम मंदिर, अमूल डेअरी, कांकरिया लेक, साबरमती आश्रम, विंटेज कार म्युझियम व डायनासोर पार्क अशा शैक्षणिक व ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. शिक्षक धीरजकुमार सोनवणे यांनी सांगितले की, या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधनाची प्रगती जवळून पाहण्याची संधी मिळाली तसेच विज्ञानाबद्दल एक चिकित्सक वृत्ती निर्माण झाली. अशा शैक्षणिक भेटींमधूनच उद्याचे शास्त्रज्ञ घडतील, असे ते म्हणाले. या विद्यार्थ्यांचा व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील, अरुण वाकचौरे, मुख्याध्यापक संपत माने, पर्यवेक्षक कैलास महाजन तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




# वासिंद शहर मनसेच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




शहापूर ग्रामीण : आज 15 ऑगस्ट या भारताच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेना वासिंद शहराच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा वासिंद येथील विद्यार्थ्यांना वह्या व शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणारे बरेचसे विद्यार्थी हे आदिवासी व शेतकरी गरीब कुटुंबातील असून या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी मनसेच्या वतीने नेहमीच मदत केली जाते आज 15 ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून या मुलांना वह्या आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप केले यावेळी वासिंद शहर अध्यक्ष अमोल बोराडे,शहापूर तालुका उपाध्यक्ष हर्षल अस्वले,वासिंद शहर सचिव कल्पेश शेलार वासिंद शहर उपाध्यक्ष विकास तांगडे वासिंद शहर सहसचिव संजय लोंढे,ज्येष्ठ कार्यकर्ते चंदू भोईर, हरीश गवळी बाळू शिरसाट, वैभव बिडवी विद्यार्थी सेना शहर उपाध्यक्ष वैभव काठोळे विद्यार्थी सेना शहर उपाध्यक्ष उन्मेश साळुंखे देवेंद्र जाधव,योगेश गुंड शुभम आगिवलेआदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# डोंबिवली शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे ७९ वा स्वातंत्र्य दिन संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. (अजित पवार) गटा तर्फे 79 वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुरेश शांताराम जोशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (143 विधानसभा अध्यक्ष) यांच्या कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी बाळ गोपाळांना खाऊ वाटण्यात आला. या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनेक कार्यकर्ते महिला, पुरुष पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान ब्रह्मा माळी 144 विधान सभा अध्यक्ष यांनी संविधानाचे वाचन केले. आणि सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या..या कार्यक्रमात सुरेश शांताराम जोशी. 143 विधानसभा डोंबिवली शहर अध्यक्ष.मिलिंद भालेराव सरचिटणीस कुणाल जोशी. उपाध्यक्ष, ब्रह्मा माळी. 144 ग्रामीण अध्यक्ष. प्रीती भानुशाली विद्या शिंदे अक्षता, मुळे रेखा माळी, उपस्थित होते.

# पेण नगरपरिषद अग्निशमन दलाचे जवान अभिजित गुरव आणि सहकाऱ्यांचा मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पेण नगरपालिका अग्निशमन दलाचे जवान अभिजीत गुरव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा अलिबाग येथे १५ ऑगस्ट दिनी महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पेण येथे महानगर गॅसची पाईप लाईन फुटून आगीच्या ज्वाला बाहेर येत होत्या भर वस्तीमध्ये ही घटना घडली होती त्यावर नगरपरिषद अग्निशमन दलाने तातडीने नियंत्रण मिळविल्याने संभाव्य धोका टळला होता. तसेच काही महिन्यांपूर्वी पेण बाजार पेठेतील एका इस्त्रीच्या दुकानाला लागलेली आग मोठ्या प्रयत्नांनंतर विझवली कोणतीही जीवितहानी न होता आपत्कालीन परिस्थिती हाताळत पेण नगरपरिषदेच्या जवानांनी अभिजित गुरव यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली पेण तालुक्यात घडलेल्या प्रत्येक आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना कोणताही त्रास न होऊ देता परिस्थिती पेण नगरपरिषदेचे अग्निशमन दलाचे जवान हाताळत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरी बद्दल यांना आज सन्मानीत करण्यात आले. यावेळी अभिजित गुरव यांच्या सोबत विशाल बामणे, प्रसन्न पाटील, विजय चव्हाण, सूरज भोईर आदी कर्मचारी उपस्थित होते.

## डिझायर फाउंडेशनचा
# चिमुकल्यांसोबत स्वातंत्र्य दिन साजरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डिझायर फाउंडेशनने चिमुकल्यांसोबत उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा केला. टिटवाळा येथील जीवन संवर्धन या अनाथ आश्रमात पार पडलेल्या कार्यक्रमात मुलांना प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले तसेच विविध खेळांचे आयोजन करून त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. खेळांमुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद खुलला. मुलांना संस्थेकडून जीवन उपयोगी वस्तू आणि शैक्षणिक साहित्य तसेच संस्थेला पंखे आणि अन्य वस्तू भेट देण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या शिक्षणाला हातभार लागला.

मुलांनी देशभक्तीपर गीतांमधून स्वातंत्र्य दिनाची खरी अनुभूती घेतली. या कार्यक्रमाला शिक्षक, आणि समाजातील मान्यवर उपस्थित राहून मुलांना प्रोत्साहन दिले. डिझायर फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण झाली. हा दिवस मुलांसाठी आणि संस्थेसाठी अविस्मरणीय ठरला. तसेच संस्थेतील सदस्य भारत पोफळकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी केसरकर, शिक्षका अनिता चौधरी, जिवन संवर्धन संस्थेचे आकाश पाटील, डिझायर संस्थेचे विकी ठोंबरे, सागर भोईर, समर, आदित्य इत्यादी सदस्य उपस्थित होते. वेळो वेळी संस्थेला मदत करणाऱ्यांचे डिझायर फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष कमलेश भोईर यांनी आभार मानले. आपल्या घरा शेजारी अनाथ, निराधार आर्थिक दुर्बल अशे लहान मुले शिक्षणापासून वंचित असतील, तर त्यांचा संस्थेशी संपर्क करून द्या असे भावनिक आव्हानं स्वतंत्र दिना दिवशी अध्यक्ष कमलेश भोईर यांच्याकडून करण्यात आले.

# जीवनदीप महाविद्यालयात वाणिज्य दिवस संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात त्यांना ते ज्या क्षेत्रात शिकत आहेत त्याबाबत अधिक ची माहिती व्हावी किंबहुना त्यातील बारकावे अधिक चांगल्या रीतीने समजून यावे याकरिता जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे दिनांक १४- ०८- २९२५ रोजी वाणिज्य दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील वाणिज्य व BAF शाखेतील विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांच्या सहभाग घेतला होता यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध उत्पादने आणि सेवांसाठी नाविन्यपूर्ण जाहिराती तयार करून त्यांची सर्जनशीलता आणि विपणन कौशल्ये प्रदर्शित केली. त्यांनी त्यांच्या कल्पना सादर करण्यासाठी आकर्षक घोषणा, जिंगल्स आणि लाईव्ह अभिनयांचा वापर केला. या उपक्रमामुळे त्यांना वास्तविक जगातील जाहिरात धोरणे समजण्यास मदत झाली. आणि त्यांचे संवाद कौशल्य वाढण्यास मदत झाली. सहभागींनी बँकिंग प्रणाली, जीएसटी



प्रक्रिया, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि आर्थिक व्यवस्थापन यासारख्या वाणिज्य संकल्पनांशी संबंधित मॉडेल तयार केले आणि सादर केले. या उपक्रमामुळे त्यांचे संशोधन कौशल्य, संकल्पनात्मक स्पष्टता आणि सार्वजनिक ठिकाणी बोलण्याचे कौशल्य वाढले आत्मविश्वास वाढला. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण आणि निकोप स्पर्धा होण्यासाठी वाणिज्य-आधारित क्विझ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांनी नाश्ता, हस्तनिर्मित उत्पादने देणारे विविध स्टॉल लावले. या उपक्रमामुळे उद्योजकीय कौशल्ये, टीमवर्क, विक्री व्यवस्थापन आणि ग्राहक सेवा अनुभवाला चालना मिळाली.

सदर कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ.अशोक वाघ , उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे या सर्वांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या जाहिरातींचे, खाद्यपदार्थांचे, हस्तकला यांचे अवलोकन केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांनी राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक देखील केले. सदर वाणिज्य दिनाचा कार्यक्रम हा वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. धनश्री चव्हाण, BAF विभागप्रमुख प्रा . मयुरी कांबळे येथील प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, महाविद्यालयातील इतर शाखातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या संपन्न झाला.

# डॉ अमोल गित्ते यांची आरोग्य क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी वाखाणण्याजोगी - आ. संजय केळकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




ठाणे : मेडिकलच्या माध्यमातून लोकांना उत्तम सेवे सोबतच सुविधा व सवलत कशी देता येईल हे बघणारे डॉ. अमोल गिते आहेत. त्यामुळे आम्हा दोघांनाही त्यांचे अप्रूप आहे. हॉस्पिटलमध्ये कोणाला भरती करायचे असेल तर पहिले खिला पाकिट तपासावे लागते. हॉस्पिटलमध्ये डिपोझीट, बील यामुळे माणुस चेपून जातो. त्यामुळे डॉ अमोल गित्ते सारख्या सामाजिक भान ठेऊन सेवा करणारे वैदकीय व्यावसायीक अजून जास्त प्रमाणात समाजात तयार होणे गरजेचे आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सामान्य नागरिकांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत तरी सुद्धा त्या योजना पासून सामान्य नागरिकांसाठी वंचीत आहेत. सिद्धिविनायक हॉस्पिटल नेहमीच सामाजिक कामात पुढाकार घेते. आता त्यांनी दिव्यांग बांधवांसाठी उत्तम काम सुरू केले असून दिव्यांग बांधवांना या कार्डच्या माध्यमातून 50 टक्के सवलत देऊन आधार दिला आहे. या पलीकडेही जाऊन घरी गरीब रुग्ण व नागरिकांसाठी अशी योजना आणली तर त्याच्या उपयोग होईल. कारण शहरात किफायतशीर आरोग्य सेवा देण्याची गरज आहे असे आ. संजय केळकर यांनी दिव्यांग बांधवांना संबोधितांना सांगितले.

स्वातंत्र्य दिनानिमित्ताने डॉ. अमोल गीते फाउंडेशन आणि दिव्यांग आघाडी भाजपा यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवांसाठी विशेष सवलत आरोग्य कार्ड वाटप शिबीराचे दि.15 ऑगस्ट 2025 रोजी सिद्धिविनायक हॉस्पिटल, वर्तकनगर, ठाणे येथे करण्यात आले होते.यावेळी आ. निरंजनजी डावखरे,भाजपा ठाणे जिल्हा अध्यक्ष संदीपजी लेले, भाजपा माजी ठाणे जिल्हाध्यक्ष संजयजी वाघुले, ठाणे शहर सरचिटणीस विक्रमजी भोईर, सिद्धिविनायक हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अमोल गीते, दिव्यांग आघाडी भाजपा सेलचे अध्यक्ष आनंद बनकर व दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेण येथील 'आई डे केअर' संस्थेच्या
# दिव्यांग मुलांनी फोडली दहीहंडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : आज संपुर्ण देशभरामध्ये दहीहंडीचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा केला जात आहे. पण बौद्धिक अक्षम (दिव्यांग) मुलांना हा आनंद घेता येत नव्हता. मात्र पेणमधील"आई डे केअर" संस्थेच्या बौद्धिक अक्षम (दिव्यांग) मुलांच्या महाराष्ट्रातील पहिल्या दहीहंडीचे आयोजन रामेश्वर कन्स्ट्रक्शन चे राजू पिचिका यांनी करून एक अनोखा उपक्रम राबविला.

या दहीहंडी उत्सवामध्ये 69 दिव्यांग मुलांनी सहभाग घेत हंडी फोडण्याचा आनंद लुटला. ही विशेष मुलं पाण्याच्या फवाऱ्यात व आनंदात चिंब भिजली होती, यावेळी निरागस मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता. या विशेष मुलांना वेगवेगळ्या कार्यक्रमातून उभारी देण्याचे काम 'आई डे केअर' संस्था करत असून गेल्या 14 वर्षांपासून रामेश्वर कन्ट्रक्शनचे सर्वेसर्वा राजू पिचिका यांनी आमच्या मुलांना दहीहंडी फोडण्याचा मान दिल्याने खूप आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे स्वाती मोहिते यांनी व्यक्त केले. या अनोख्या कार्यक्रमानंतर सर्व दिव्यांग मुलांना पेण उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल,उद्योजक राजू पिचिका, सौ लक्ष्मी पिचिका, प्रकाश झावरे,रोहित पिचिका,लाहिरी पिचिका, संदीप शृंगारे, राजीव पडवळ,नेहा झावरे,दीपा श्रृंगारे,शंकरकुमार पडवळ,सरोजा पडवळ आदी मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आली.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 9082664781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com